12-20

जागतिक आरोग्य दिन

७ एप्रिल २०२१

उत्तम आरोग्य ही सुखी व यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे .आरोग्य उत्तम राखण्यासाठी नियमित व्यायाम व सकस आहार आवश्यक आहे .याच दृस्टिकोणातून रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर येथील शारीरिक शिक्षण विभागाद्वारे जागतिक आरोग्य दिनानिमित्त " सद्यस्थितीत आयुर्वेद " या विषयावर ऑनलाइन वेबिनारचे आयोजन ६ एप्रिल २०२१ रोजी करण्यात आले होते . सदर वेबिनारला प्रमुख वक्ते वैद्य योगेश काळे तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ के जी कानडे उपस्थित होते . वैद्य काळे यांनी प्राचीन काळापासून आयुर्वेदाला किती महत्त्व आहे त्याचप्रमाणे आयुर्वेदानुसार आपली जीवनशैली कशी असावी, वेगवेगळ्या ऋतुत कोणता आहार सेवन करावा , मनुष्याचे दैंनदिन जीवन क्रम कसा आसवा व कोविड १९ परिस्थितित घरच्या घरी कोणती काळजी घ्यावी जेणेकरून प्रतिकार शक्ती चागली राहील या सदर्भात मार्गदर्शन केले .

मा. प्राचार्यांनी आपले मनोगत व्यक्तं करताना आधुनिक जीवन शैली बरोबर निसर्गाचे सवर्धन करणे कसे गरजेचे आहे याचे महत्त्व पटवून दिले याच दुस्टिकोणातून महविद्यालयाच्या परिसरात जास्तीत जास्त आयुर्वेदिक वनस्पतीची लागवड करण्याचा मानस व्यक्त केला .सदर वेबिनर साठी ३५८ जनाणी सहभाग नोद्वला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.महाकाळ एस सी यांनी केले तर आभार शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा .डॉ सुनील पानसरे यांनी मानले

शारीरीक शिक्षण संचालक
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर

Principal
Annasaheb Awate College,
Manchar,Dist.Pune